**सभापती महोदय, अध्यक्ष महाराज आणि सन्माननीय सदस्यहो,**

१. राज्य विधानमंडळाच्या २०१६ या वर्षाच्या पहिल्या अधिवेशनामध्ये आपल्या सर्वांचे स्वागत करताना मला अतिशय आनंद होत आहे.

२. जनतेच्या न्याय्य मागण्यांची पूर्तता करणे आणि त्यांचे जीवनमान उंचावणे यांसाठी माझे शासन कटिबध्द आहे. या प्रयोजनासाठी सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक आणि सांस्कृतिक अशा विविध क्षेत्रांमध्ये जनतेच्या कल्याणार्थ अनेक लोकाभिमुख निर्णय घेतले आहेत

३. मला सांगताना आनंद होतो की, आराध्य दैवत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांचे मुंबई येथे अरबी समुद्रात राष्ट्रीय स्मारक उभारण्यासाठी सर्व परवानग्या मिळालेल्या आहेत. या प्रयोजनासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची यापूर्वीच नियुक्ती केली आहे. २०१९ पर्यंत प्रस्तुत स्मारकाचे काम पूर्ण करण्याचा शासनाचा मनोदय आहे.

४. " रायगड महोत्सव " यांस लक्षणीय प्रतिसाद मिळाला. याचा उल्लेख करण्यास मला अत्यानंद होत आहे व राज्यातील जनतेसमोर छत्रपती शिवाजी महाराजांचा सांस्कृतिक वारसा मांडण्याचा आमचा उद्देश मोठ्या प्रमाणात यशस्वी झाला आहे.

५. २ ऑक्टोबर २०१९ रोजी महात्मा गांधी यांची आगामी १५० वी जयंती लक्षात घेता, वर्धा-सेवाग्राम-पवनार या परिसराचा विकास करण्याचे शासनाने योजिले आहे. यामध्ये प्रामुख्याने पायाभूत सोयी आणि नागरी सुविधांचा समावेश असेल.

६. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती प्रीत्यर्थ माझ्या शासनाने २०१५-१६ हे वर्ष " समता व सामाजिक न्याय वर्ष " म्हणून घोषित केले आहे. याप्रसंगी केंद्र व राज्य शासन विविध उपक्रम राबवित आहेत. डॉ. आंबेडकर यांचे समतावादी समाज निर्माण करण्यासंबंधीचे योगदान पुढील पिढ्यांना माहीत व्हावे यासाठी

त्यांच्या जीवनाकार्याशी निगडित असलेल्या पाच ठिकाणांचा केंद्र शासनाकडून " **पंचतीर्थ** " म्हणून विकास केला जाणार असून त्यामध्ये महाराष्ट्रातील जेथे त्यांनी सुरुवातीचे शिक्षण घेतले त्या रत्नागिरी जिल्ह्यातील आंबवडे गावाचा आणि मुंबईतील इंदू मिलचा समावेश आहे.

७. शासनाने, मागासवर्गीय मुलींसाठी ५० नवीन वसतिगृहे बांधण्याचे आणि पुणे, नागपूर व मुंबई येथे नोकरी करणाऱ्या महिलांकरिता तीन वसतिगृहे बांधण्याचे ठरविले आहे. शासनाने, " डॉ. बाबासाहेब आंबेडकर समता प्रतिष्ठान " स्थापन करण्याचा आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्यासाठी विस्तार इमारत बांधण्याचादेखील निर्णय घेतला आहे. हे सर्व उपक्रम पुढील दोन वर्षात पूर्ण करण्यात येतील. शासनाने, अनुसूचित जातीच्या व अनुसूचित जमातीच्या उद्योजकांसाठी प्रोत्साहनपर विशेष पॅकेज योजना सुरू करण्याचादेखील निर्णय घेतला आहे.

८. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अभूतपूर्व कार्य आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहचवण्याचा माझ्या शासनाचा प्रयत्न आहे. यासाठी त्यांचा पुतळा ऑगस्ट २०१५ मध्ये जपानमधील कोयासन येथे उभारण्यात आला आहे. त्याचप्रमाणे १९२१-२२ मध्ये लंडन येथे शिक्षणासाठी विद्यार्थी म्हणून ते ज्या घरात राहत होते ते घर माझ्या शासनाने संपादित करून त्याचा ताबा घेतला आहे व आता ते घर केंद्र सरकारने राष्ट्रीय स्मारक म्हणून घोषित केले आहे.

९. शासनाने, दादर येथे स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांचे स्मारक उभारण्याचा यापूर्वीच निर्णय घेतला असून त्यासंदर्भात पुढील कार्यवाही प्रगतिपथावर आहे. भूतपूर्व उप मुख्यमंत्री व केंद्रीय मंत्री स्वर्गीय गोपीनाथजी मुंडे यांचे औरंगाबाद येथे स्मारक उभारण्याकरिता डिसेंबर, २०१५ मध्ये शासनाने जागा उपलब्ध करून दिली आहे.

१०. माझे शासन, महाराष्ट्र-कर्नाटक सीमा वादाबाबत गंभीर व संवेदनशील आहे. भारताच्या सन्माननीय सर्वोच्च न्यायालयाने १२ सप्टेंबर, २०१४ रोजी झालेल्या न्यायालयीन प्रकरणाच्या सुनावणीअंती दाव्यातील साक्षीपुरावे नोंदविण्यासाठी न्यायालय आयुक्त म्हणून जम्मू व काश्मीर उच्च न्यायालयाचे माजी मुख्य न्यायाधीश श्री. मनमोहन सरीन यांची नियुक्ती केली आहे. शासनाने, कर्नाटक राज्यातील वादग्रस्त सीमा भागांतील मराठी भाषिक

जनतेच्या समस्या प्रभावीपणे सोडविण्यासाठी सार्वजनिक बांधकाम व सहकार मंत्री यांची समन्वयक म्हणून नेमणूक केली आहे.

११. राज्य, मागील ४ वर्षांपासून सतत अवर्षणाचा सामना करीत असून चालू खरीप हंगामामध्ये जवळपास १५,७५० गावे अवर्षणामुळे बाधित झाली आहेत. केंद्र सरकारने अवर्षण निवारणासाठी महाराष्ट्र शासनाला ३,०४९ कोटी रुपयांचे सहाय्य दिले असून महाराष्ट्र राज्याला यापूर्वी देण्यात आलेल्या सर्व प्रकारच्या सहाय्यापेक्षा ते सर्वाधिक आहे. माझ्या शासनाने, आजतागायत २५३६ कोटी रुपये अवर्षणग्रस्त शेतकऱ्यांना अर्थसहाय्य म्हणून वितरित केले आहेत.

१२. २०१५ मध्ये अवकाळी पाऊस व गारपीट झाल्याने शासनाने ज्यांच्या पिकाचे नुकसान झाले तसेच घरांची पडझड झाली त्या व्यक्तींना सहाय्य देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी केंद्र सरकारने राज्य आपत्ती प्रतिसाद निधी अंतर्गत सहाय्याचे निकष सुधारित केले आहेत. त्यानुसार १ एप्रिल, २०१५ पासून राज्य शासनाने वाढीव वित्तीय सहाय्याबाबतचे निकष स्वीकृत केले आहेत.

१३. माझ्या शासनाने, नोव्हेंबर-डिसेंबर २०१४ आणि फेब्रुवारी-मार्च २०१५ दरम्यान ज्या शेतकऱ्यांनी पीक कर्जाचा लाभ घेतला व ज्यांच्या पिकांची नैसर्गिक आपत्तीमुळे हानी झाली अशा शेतकऱ्यांना पीक कर्जावरील तीन महिन्यांचे व्याज माफ करण्याचा निर्णय घेतला आहे. नैसर्गिक आपत्तींमुळे वारंवार होणारे पिकांचे नुकसान लक्षात घेता, माझ्या शासनाने पीक कर्जांची पुनर्रचना करण्याचा निर्णय घेतला आहे आणि कर्जावरील व्याज माफ करून कर्जाच्या वसुलीस स्थगिती दिली आहे. या निर्णयाचा परिणाम म्हणून, बँकांनी अंदाजे ३,५०० कोटी रुपयांच्या पीक कर्जाची मध्यम मुदतीच्या कर्जात पुनर्रचना केली आहे, ज्याचा फायदा जवळपास ५.५ लाख शेतकऱ्यांना झाला आहे. शिल्लक पीक कर्जांची पुनर्रचना केल्यामुळे, अकोला, वाशिम, अमरावती, यवतमाळ, चंद्रपूर व नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना, ज्या शेतकऱ्यांची कर्जे पुनर्रचित केलेली होती, त्या सुमारे १,१६,००० शेतकऱ्यांना अंदाजे ४०५ कोटी रुपयांची नवीन पीक कर्जे देणे शक्य झाले.

१४. अवर्षणग्रस्त क्षेत्रातील शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी, चालू वीज देयकांची ३३ टक्के इतकी रक्कम माफ करण्यात आली आहे. " **कृषि संजीवनी** " योजनेच्या धर्तीवर स्थानिक संस्थांच्या सुमारे ५०,००० पिण्याच्या पाणी योजनांना लाभदायी ठरणारी " **पाणी संजीवनी** " योजना सुरू करण्यात आली आहे.

१५. राज्यातील अवर्षणग्रस्त क्षेत्रांमध्ये विजेच्या पायाभूत सुविधांचे बळकटीकरण करण्यासाठी, माझ्या शासनाकडून महावितरणला भरीव वित्तीय सहाय्य देण्यात येत आहे.

१६. अवर्षणग्रस्त शेतीचे पुनरुज्जीवन करणे हे राज्यापुढील सर्वात मोठे आव्हान आहे. पावसाच्या पाण्याचा एक एक थेंब साठवणे व तो शेतीकरिता उपयोगात आणणे ही काळाची गरज आहे.

१७. अवर्षणप्रवण गावांमध्ये प्रतिकूल परिस्थितीवर मात करण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करण्याच्या उद्देशाने डिसेंबर, २०१४ मध्ये " जलयुक्त शिवार अभियान " सुरू केल्यानंतर, सुमारे ६,९०,००० सहस्त्र घन मीटर इतकी पाणी साठवण क्षमता निर्माण करून आतापर्यंत सुमारे १,३३,००० पेक्षा जास्त कामे पूर्ण करण्यात आली आहेत. २०१६-२०१७ मध्ये या अभियानांतर्गत ५,१८२ गावांची निवड करण्यात आली आहे.

१८. राज्यातील अवर्षणप्रवण क्षेत्रांतील जलसंधारणाच्या कामांना गती मिळण्यासाठी, महाराष्ट्र राज्य जलसंधारण महामंडळाकरिता २०२५ पर्यंत भाग भांडवल सहाय्य म्हणून १०,००० कोटी रुपये एवढ्या अनुदानाची तरतूद करण्यात येईल.

१९. माझ्या शासनाने ३८५ कोटी रुपये इतका राज्याचा हिस्सा व जागतिक बँकेचे जवळपास ९०० कोटी रुपये इतके सहाय्य घेऊन " **जलस्वराज कार्यक्रम-दोन** " सुरू केला आहे.

२०. विदर्भ व मराठवाडा क्षेत्रांसाठी १,००० कोटी रुपयांच्या सहाय्यासह, कृषि पंपाच्या ऊर्जीकरणाकरिता एक विशेष मोहीम सुरू करण्यात आली आहे.

२१. " **अटल सौर कृषि पंप योजने** "अंतर्गत अवर्षणग्रस्त क्षेत्रातील शेतकऱ्यांना सुमारे १०,००० सौर कृषि पंप देण्यात येत असून, त्यासाठी त्यांना पंपाच्या किंमतीपैकी

केवळ ५ टक्के इतकी रक्कम द्यावी लागणार असून त्यांना कोणताही देखभाल खर्च व वीजेचे आवर्ती देयक द्यावे लागणार नाही.

२२. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत आगामी ३ वर्षांमध्ये सुमारे १ लाख विहिरींचे बांधकाम करण्याचे शासनाचे उद्दिष्ट असून २०१५-१६ मध्ये आतापर्यंत ३१ हजार विहिरी बांधून पूर्ण झालेल्या आहेत.

२३. माझ्या शासनाने, शाश्वत शेतीस उत्तेजन देणारी **“ मागेल त्याला शेततळे ”** ही योजना घोषित केली आहे. या योजनेअंतर्गत पहिल्या टप्प्यात सुमारे ५२,००० शेततळ्यांची कामे हाती घेण्यात येतील.

२४. सुमारे ३०० वर्षांपूर्वी भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली आणि नागपूर या जिल्ह्यांमध्ये जवळ जवळ एक लाख हेक्टर सिंचनक्षमता असणारे जवळपास ६,८०० मालगुजारी तलाव बांधण्यात आले होते. सध्या या तलावांची दुरुस्ती करण्याची गरज आहे. आतापर्यंत विविध योजनांखाली १,४०० तलावांची दुरुस्ती करण्यात आली आहे आणि आगामी वित्तीय वर्षात राज्य शासन आणखी अशा तलावांच्या दुरुस्तीची कामे हाती घेईल.

२५. महाराष्ट्रातील सागरी किनारी जिल्ह्यांमध्ये राष्ट्रीय चक्रीवादळ धोका सौम्यकरण प्रकल्पाच्या टप्पा-२ ची अंमलबजावणी करण्याचे ठरविले असून एकूण प्रकल्प खर्च ३९८ कोटी रुपये इतका आहे.

२६. उपद्रवी कीटक, रोग आणि निसर्गाचा लहरीपणा यामुळे होणाऱ्या पिकांच्या नुकसानीची जोखीम कमी करण्यासाठी, माझ्या शासनाने राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत “ संरक्षित शेती ” प्रकल्प राबवण्याचा निर्णय घेतला आहे.

२७. शेतकऱ्यांना सुनिश्चित पीक उत्पादनासाठी गरजेच्या वेळी संरक्षित सिंचन उपलब्ध करून देण्याकरिता, शासनाने पर्जन्यजल संचय करण्यासाठी “ सामूहिक शेततळी ” बांधण्याचा निर्णय घेतला आहे.

२८. राष्ट्रीय शाश्वत शेती अभियानांतर्गत **“ परंपरागत कृषि विकास योजना (सेंद्रीय शेती) ”** ही नवीन योजना शासनाने २०१५-१६ पासून आगामी ३ वर्षांच्या कालावधीत राबविण्याचे ठरविले आहे.

२९. यावर्षामध्ये, कांदा दीर्घकाळ टिकावा यासाठी, कमी खर्चाच्या साठवण गृहांचे बांधकाम करण्याचा प्रकल्प मंजूर करण्यात आला आहे. अशा बांधकामामुळे कांदा बाजार दीर्घकाळ स्थिर राखण्यास मदत होईल व या क्षेत्रातील सर्वांना याचा लाभ होईल.

३०. शेतकरी व त्याच्या कुटुंबाचे हित लक्षात घेता, राज्य शासनाने **" गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना "** सुरू केली आहे, ज्यात राज्यातील सर्व १.३७ कोटी शेतकऱ्यांचा एकूण हप्ता शासनाद्वारे भरला जातो. या योजनेअंतर्गत, मृत शेतकऱ्याच्या जवळच्या नातलगास दोन लाख रुपये इतकी नुकसानभरपाई मिळेल आणि एक अवयव कायमचा निकामी झाल्यास, शेतकऱ्यास एक लाख रुपयापर्यंत नुकसानभरपाई मिळेल.

३१. **" जागतिक मृदा दिनानिमित्त "** ५ डिसेंबर २०१५ रोजी सुमारे १५ लाख मृदा आरोग्य पत्रिकांचे शेतकऱ्यांना वाटप केले असून, शाश्वत शेती करण्यासाठी आवश्यक असणारी जमिनीची सुपीकता राखण्यासाठी त्यांना अशा पत्रिकांचा उपयोग होईल.

३२. शेतकऱ्यांना त्यांच्या पिकाचा चांगला आणि सुनिश्चित परतावा मिळण्यासाठी त्यांचे गट तयार करून त्यांना बाजाराशी जोडण्यात येत आहे. चालू वर्षात एकात्मीकृत कृषि विकास उपक्रमांसाठी सार्वजनिक खाजगी भागीदारी अंतर्गत २१ प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली आहे. त्याचा जवळपास २ लाख शेतकऱ्यांना लाभ होणार असून ते सुमारे एक लाख मेट्रिक टनापर्यंतचे उत्पादन थेट कृषि प्रक्रिया उद्योग केंद्रांना आणि घाऊक व्यापाऱ्यांना विकू शकतात.

३३. कृषि प्रक्रिया उद्योग केंद्रे उभारणीसाठी प्रत्येक महसूल विभागामध्ये ५ कोटी रुपयांचा एक सुधारित प्रकल्प हाती घेण्याचे ठरविले आहे. पुढील पाच वर्षांच्या कालावधीमध्ये अशा ३५ प्रकल्पांचे काम पूर्ण करण्यात येईल.

३४. कृषि, कृषि पणन, कृषि प्रक्रिया, विधि, वाणिज्य व अर्थशास्त्र यांसारख्या क्षेत्रांतील२ ते ४ तज्ज्ञांचे नामनिर्देशन करून कृषि उत्पन्न बाजार समित्यांचे कामकाज व्यवसायाभिमुख करण्याचे ठरविले आहे.

३५. आगामी हंगामापासून विकेंद्रित प्रापण योजनेची अंमलबजावणी करण्यात येईल. याद्वारे साठवण व वाहतूक यांवरील खर्च कमी होण्यास आणि सार्वजनिक वितरण व्यवस्था अधिक प्रभावीपणे राबविण्यास मदत होईल.

३६. ग्रामीण पायाभूत सुविधा विकास निधी अंतर्गत, नाबार्डच्या कर्जासह सार्वजनिक वितरण व्यवस्थेसाठीच्या साठवण क्षमतेत १६,००० मेट्रिक टनाहून अधिक वाढ करण्यात आलेली असून सुमारे २,१२,००० मेट्रिक टन क्षमता असलेल्या १२८ गोदामांची बांधकामे विविध टप्प्यांवर आहेत.

३७. माझ्या शासनाने, विदर्भ व मराठवाड्यातील शेतीविषयक विवंचना भासणाऱ्या १४ जिल्ह्यांमध्ये विविध निवारण उपाययोजना हाती घेतल्या आहेत. या जिल्हयांतील ६८ लाखांहून अधिक शेतकऱ्यांना राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, २०१३ अन्वये, लाभान्वित केले आहे. त्यासाठी प्रतिमाह अंदाजे ८६ कोटी रुपये इतका खर्च येत आहे. पीडित शेतकरी निश्चित करून त्यांना त्यांच्या वैद्यकीय व इतर आकस्मिक गरजा भागविण्यासाठी सहाय्य करण्याकरिता यवतमाळ व उस्मानाबाद या जिल्ह्यांमध्ये **“ बळीराजा चेतना अभियान ”** हा पथदर्शी प्रकल्प राबविण्यात येत आहे. अधिक उत्पादक शेतीसाठी कृषि यांत्रिकीकरणास उत्तेजन देण्यासाठी **“ दिवंगत मोतीरामजी लहाने कृषि समृध्दी प्रकल्प ”** हा प्रकल्प दोन जिल्ह्यांमध्ये मंजूर करण्यात आला आहे. विविध योजना व कार्यक्रम एककेंद्राभिमुख करून पुढील तीन वर्षांत १,२०० कोटी रुपये उपलब्ध करून देण्यात येतील. शेतकऱ्यांचे आरोग्यविषयक समुपदेशन व्हावे याकरिता **प्रेरणा प्रकल्प** हा व्यापक आरोग्य कार्यक्रम सुरू करण्यात आला आहे. शेतकऱ्यांच्या आजारपणामुळे खालावणाऱ्या आर्थिक परिस्थितीचा ताण कमी करण्यासाठी राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेची व्याप्ती वाढवली आहे व या योजनेखालील दावे जलदगतीने निकाली काढण्यात येत आहेत. शेतीविषयक विवंचना भासणाऱ्या जिल्ह्यातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या विधवांना ऑटो रिक्षा परवाने देऊन त्यांच्या उपजीविकेस हातभार लावण्यासाठी **“ हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे निराधार स्वावलंबन योजना ”** सुरू केली आहे.

३८. जनतेचे रक्षण व गुन्हेगारीचा बिमोड करण्यासाठी माझ्या शासनाने कडक उपाययोजना केल्या आहेत. पोलीस दलाची जलदगतीने तंत्रज्ञानात्मक दर्जावाढ करण्यात येत असून भारत सरकारचे गुन्हे व गुन्हेगारी शोधन जाळे व यंत्रणा प्रकल्प यशस्वीपणे पूर्ण करण्यात महाराष्ट्र राज्य अग्रेसर आहे. पुणे येथील सीसीटीव्ही प्रकल्प पूर्ण केला आहे व आता शासन मुंबई, ठाणे, औरंगाबाद व सोलापूर येथील सीसीटीव्ही प्रकल्प वेळेत पूर्ण करण्यावर भर देत आहेत.

३९. महिला व बालकांची सुरक्षा हा एक महत्त्वाचा मुद्दा असून त्यासाठी मुंबईमध्ये ९० हून अधिक महिला पोलीस गस्त पथके कार्यरत आहेत.

४०. माझ्या शासनाने अपराधसिद्धीचे प्रमाण ३६ टक्क्यांवरून ५२ टक्क्यांपर्यत वाढविण्यात मागील एका वर्षात यश मिळवले आहे. अपराधसिद्धीच्या प्रमाणात वाढ झाल्यामुळे गुन्हेगार व समाजविघातक घटक, गुन्हेगारी कारवाया करण्यापासून परावृत्त होतील.

४१. नक्षलविरोधी मोहिमा अधिक प्रभावी करण्यात येऊन त्या बाधित क्षेत्रात सुव्यवस्था राखण्यास अग्रक्रम देण्यात येत आहे.

४२. पोलिसांना घरे उपलब्ध करून देण्यासाठी, महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ, सार्वजनिक बांधकाम विभाग, म्हाडा व हुडको हे संयुक्तपणे काम करीत आहेत. यावर्षी जवळपास ११,५०० इतक्या निवासस्थानांचे संपादन व बांधकाम करण्याचे काम हाती घेतले असून पुढील वर्षात सुमारे २६,००० निवासस्थाने उपलब्ध करून देण्यात येतील.

४३. सागरी सुरक्षा बळकट करण्यासाठी १,४०,००० पेक्षा अधिक कोळी बांधवांना बायोमेट्रीक कार्ड देण्यात आली आहेत. एप्रिल, २०१६ पर्यंत उर्वरित कोळी बांधवांनादेखील ती देण्यात येतील. सर्वच ९१ जहाज नांगरणी स्थानांवर सुरक्षा रक्षक तैनात करण्यात आलेले आहेत.

४४. राज्याच्या विनंतीवरून, केंद्र सरकार सर्व सागरी किनारी जिल्ह्यांमध्ये, मत्स्यव्यवसाय संनियंत्रण, नियंत्रण व संनिरीक्षण केंद्रे उभारत आहे. ही केंद्रे कोळी

बांधवांच्या ओळखीकरिता एकसमान व्यासपीठाची तरतूद करील व सागरी पोलीस, नौदल व तटरक्षक दल यांच्यातील समन्वयाची सुनिश्चिती करील.

४५. उच्च न्यायालय व दुय्यम न्यायालयांमध्ये न्यायिक प्रक्रिया व प्रशासन गतिमान करण्यासाठी, माझ्या शासनाने, ४५ न्यायालय व्यवस्थापकांच्या पदांना कायमस्वरूपी मुदतवाढ देऊन देशात अग्रेसर भूमिका घेतली आहे. शासनाने मुंबई उच्च न्यायालयात न्यायाधीशांची १९ नवीन पदे निर्माण केली असून, प्रलंबित प्रकरणे जलद गतीने निकालात काढण्यासाठी आवश्यक त्या पायाभूत सुविधा व कर्मचारीवर्ग याकरिता निधी मंजूर केला आहे.

४६. औद्योगिकीकरणात महाराष्ट्राचे अग्रस्थान अबाधित रहावे याकरिता राज्याने महत्त्वाकांक्षी " मेक इन महाराष्ट्र " अभियान सुरू केले आहे.या प्रयोजनासाठी विविध उद्योगस्नेही धोरणे आखण्यात आली आहेत. नवीन उद्योगांसाठी महाराष्ट्र हे पसंतीचे ठिकाण कायम राहण्यासाठी आवश्यक त्या मंजुऱ्या मिळविण्यासाठीच्या विविध शासकीय प्रक्रियांचे सुसूत्रीकरण व सुलभीकरण करण्यात आले आहे. **" मैत्री "** हे एक खिडकी व्यासपीठ प्रस्तावित केले असून त्यामुळे सेवा हक्क अधिनियमान्वये वैधानिक अधिकारांचा वापर करून १५ विभागांमधील ऑनलाईन अर्ज व ४४ मंजुऱ्या मिळवणे सुकर होईल.

४७. राज्याने, वास्तविक औद्योगिक प्रयोजनासाठी शेतजमिनी खरेदीची प्रक्रिया सुलभ करण्याकरिता कुळवहिवाट व शेतजमीन कायद्यात सुधारणा केली आहे. राज्य व केंद्र शासनाच्या यथोचित मान्यताप्राप्त प्रकल्पांना आता जिल्हाधिकाऱ्यांमार्फत जमिनी दिल्या जातील.

४८. याशिवाय, माझ्या शासनाने विविध उद्योगधंद्यांना प्रोत्साहन मिळावे याकरिता नवीन धोरणे आखली आहेत. विदर्भ व मराठवाड्यामध्ये अधिक उद्योगधंदे आकर्षित व्हावेत याकरिता मूल्यवर्धित करात पूर्ण सूट देण्याचे धोरण स्वीकारले आहे. राज्यात फॅब प्रकल्पांना चालना देण्यासाठी नवीन इलेक्ट्रॉनिक धोरण आखले आहे. तसेच नवीन रिटेल धोरण आखणारे महाराष्ट्र देशातील पहिले राज्य आहे. ई-कॉमर्सची वाढती लोकप्रियता विचारात घेऊन व लॉजिस्टीक हब्ज स्थापन करण्याला उत्तेजन देण्याकरिता काही प्रमाणात

करसवलती देण्याचे प्रस्तावित आहे. किनारी क्षेत्राची प्रचंड संभाव्य आर्थिक क्षमता उपयोगात आणण्यासाठी "महाराष्ट्र सागरी औद्योगिक धोरण" आखले आहे.

४९. मुंबई येथे भारत सरकारने नुकत्याच आयोजित केलेल्या " मेक इन इंडिया " सप्ताहाच्या यजमानपदाचा मान महाराष्ट्र राज्याला मिळाला. परवान्यांच्या सुलभतेचे वातावरण, भावी नवीन औद्योगिक धोरणे आणि राज्याची औद्योगिक क्षेत्रातील बलस्थाने देशविदेशातील उद्योगपतींसमोर मांडण्यात आली. परिणामी, विदेशी गुंतवणुकीसह एकूण ८ लाख कोटी रुपयांहून अधिक गुंतवणूक महाराष्ट्रात आकर्षित झाली असून त्याद्वारे सुमारे ३० लाख नवीन रोजगारसंधी निर्माण होतील. या सप्ताहास मनापासून पाठिंबा दिल्याबद्दल मी सर्वांचे आभार मानतो.

५०. दिल्ली-मुंबई औद्योगिक कॉरिडॉर प्रकल्पाअंतर्गत ४,००० हेक्टरपेक्षा अधिक क्षेत्रफळावर औरंगाबाद औद्योगिक नगरी मर्यादित यांनी आपले विकासकाम यापूर्वीच सुरू केले आहे.

५१. नवीन वस्त्रोद्योग धोरणाअंतर्गत, बँकांनी आतापर्यंत ११२७ वस्त्रोद्योग प्रकल्प मंजूर केले असून त्या प्रकल्पांमध्ये अंदाजे ११,००० कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात आली आहे व सुमारे ६४,००० नोकऱ्या निर्माण करण्यात आल्या आहेत.

५२. दर्जेदार पायाभूत सुविधा पुरवण्याचा माझ्या शासनाचा विशेष प्रयत्न आहे. विविध रस्ते, रेल्वे, विमानतळे, बंदरे, ऊर्जा व सिंचन प्रकल्प हाती घेतलेले आहेत.

५३. रस्ते विकास कार्यक्रम, २००१-२१ याअंतर्गत जवळपास ३,३७,००० किलोमीटर लांबीच्या रस्त्याच्या लक्ष्यापैकी, राज्याने २,६३,००० किलोमीटर पेक्षा जास्त लांबीचे रस्ते पूर्ण केले असून, जवळपास ६,८०० किलोमीटर लांबीच्या राज्य महामार्गाचे राष्ट्रीय महामार्गात रूपांतरण करण्यात यश आले आहे.

५४. महाराष्ट्राच्या पश्चिम सागरी किनाऱ्याला लागून असलेल्या प्रस्तावित सागरी किनारी महामार्गामुळे उद्योग, पर्यटन यांस प्रोत्साहन मिळेल आणि त्यामुळे संरक्षणाच्या गरजांचीही पूर्तता होईल.

५५. माझे शासन, २०१६-१७ मध्ये ५ महसूल विभागांना जोडणारा नागपूर-मुंबई अतिजलद दळणवळण द्रुतगती महामार्ग बांधण्याचे काम हाती घेईल, जो देशातील सर्वात लांब हरितक्षेत्र द्रुतगती महामार्ग असेल.

५६. सुमारे १५० किलोमीटर इतक्या लांबीच्या प्रस्तावित पुणे चक्राकार मार्गाचे बांधकाम लवकरच सुरु करण्यात येईल. ठाणे खाडीवरील पुलाचे बांधकाम सुद्धा सुरु करण्यात येईल. तसेच, खोपोली पथकर नाका ते कुसगावच्या दरम्यान सुमारे ८.२ किलोमीटरचा बोगदा आणि ४ किलोमीटर लांबीचा उन्नत मार्ग बांधण्याचे देखील प्रस्तावित आहे.

५७. ठाणे-घोडबंदर रोड, विदर्भातील २७ रेल्वे उड्डाण पूल, वाकण-पाली-खोपोली रस्त्याचे चौपदरीकरण, ठाणे ते बोरीवली भुयारी मार्ग आणि कोन ते कल्याण-डोंबिवली-शिळफाटा उन्नत मार्ग बांधण्यासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास कार्यान्वयन अभिकरण म्हणून नियुक्त करण्यात आले आहे.

५८. " गतिमान सिंचन लाभ कार्यक्रमाअंतर्गत " येणाऱ्या महाराष्ट्रातील वाघोर, लोअर पांजरा, लोअर वर्धा, लोअर दुधना, तिल्लारी, नांदूर-मधमेश्वर-टप्पा-२ आणि बावनथडी या सात चालू सिंचन प्रकल्पांचा अंतर्भाव " प्रधान मंत्री कृषि सिंचाई योजनेत " करण्यात आला आहे.

५९. शासनाने, विविध योजना एककेंद्राभिमुख करून नदी-नाले पुनरुज्जीवन कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेतला आहे. आतापर्यंत ६३ नदी-नाल्यांच्या पुनरुज्जीवन प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली आहे.

६०. २०१६-१७ मध्ये कोराडी येथील औष्णिक वीज निर्मिती केंद्रात १९८० मेगावॅट व चंद्रपूर येथील औष्णिक वीज निर्मिती केंद्रात १००० मेगावॅट इतक्या क्षमतेचे नवीन वीज निर्मिती संच कार्यरत होणार आहेत. परिणामी राज्यात अतिरिक्त वीज उपलब्ध होणार आहे.

६१. जागतिक दर्जाचे पर्यटनस्थळ असलेल्या एलिफंटा बेटातील वीजेच्या पायाभूत सुविधेमध्ये २८ कोटी रुपयांची गुंतवणूक करून त्यास लवकरच नियमित वीज पुरवठा करण्यात येणार आहे.

६२. विजेच्या पायाभूत सुविधांचे बळकटीकरण करण्यासाठी केंद्राच्या सहाय्याने राज्यातील ग्रामीण क्षेत्रांमध्ये सुमारे २२०० कोटी रुपयांची " दीनदयाळ उपाध्याय ग्राम ज्योती योजना " व नागरी क्षेत्रांमध्ये सुमारे २३०० कोटी रुपयांची " एकात्मिक वीज विकास योजना " पुढील चार वर्षांमध्ये अंमलात आणली जाईल.

६३. २०१९ पर्यंत १४,४०० मेगावॅट क्षमतेच्या मर्यादेपर्यंत नवीन व नवीकरण ऊर्जा विकासाला चालना देण्यासाठी आणि घरगुती वापरासाठी नवीकरण ऊर्जेच्या ऑफ-ग्रीड निर्मितीस उत्तेजन देण्यासाठी मागील एका वर्षात नवीन धोरणे घोषित करण्यात आली आहेत.

६४. रेल्वे मंत्रालयाबरोबर संयुक्त उपक्रम म्हणून " महाराष्ट्र लोहमार्ग पायाभूत सुविधा विकास कंपनी " ची स्थापना करून राज्यातील रेल्वे प्रकल्प त्वरेने कार्यान्वित करण्यात येतील. जयगड बंदर आणि दिघी बंदर यासाठीच्या बंदर-रेल्वे जोडमार्ग प्रकल्पांमध्ये, शासनाने समभागाच्या माध्यमातून सहभागी होण्याचे ठरविले असून, वाढवण येथील जवाहरलाल नेहरु बंदर विश्वस्तमंडळाच्या सॅटेलाईट बंदर प्रकल्पामध्ये २६ टक्के समभाग खरेदी करण्याचेदेखील ठरविले आहे.

६५. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या पात्रता फेरीसाठीच्या जागतिक निविदांना लक्षणीय प्रतिसाद मिळाला आहे. २०१९ मध्ये या नवीन विमानतळावरून वाहतूक सुरू करण्याचे उद्दिष्ट आहे. शिर्डी विमानतळाचे काम लवकर पूर्ण व्हावे याकरिता आवश्यक ते वित्तीय सहाय्य देण्याचे प्रस्तावित आहे.

६६. १५ ते ४५ या वयोगटातील व्यक्तींना कौशल्य विकास प्रशिक्षण देण्यासाठी, " **प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियान** " सुरू करण्यात आले आहे. उमेदवारांना त्यांच्या आवश्यकतेनुसार प्रशिक्षित करण्यासाठी आणि प्रशिक्षणानंतर त्यांना नोकरी देण्यासाठी आतापर्यंत जवळपास ५०० प्रशिक्षण भागीदारांची निवड करण्यात आली आहे.

६७. शिकाऊ उमेदवार अधिनियम, १९६१ अन्वये " उद्योग शिकाऊ उमेदवार योजने " अंतर्गत, सुमारे ६७ हजारांपेक्षा अधिक उमेदवारांना प्रशिक्षण देण्यात आले आहे.

६८. वेगाने होत असलेल्या नागरीकरणाच्या वाढत्या आव्हानांस समर्थपणे सामोरे जाण्याकरिता माझ्या शासनाने केंद्र सरकारच्या मदतीने अनेक कार्यक्रम हाती घेतले आहेत.

६९. राज्याच्या नागरी क्षेत्रांमध्ये सार्वजनिक वाहतुकीत सुधारणा करण्याच्या दृष्टीने, मुंबई मेट्रो रेल्वे टप्पा-३, तसेच नागपूर व पुणे येथील मेट्रो प्रकल्पाचे काम लवकरच सुरू होणार असून, नवी मुंबईतील बेलापूर-पेंढार हा ११ किलोमीटर इतक्या लांबीचा मेट्रो प्रकल्प जुलै २०१७ पर्यंत पूर्ण होईल.

७०. पुढील ३ ते ४ वर्षांमध्ये ११८ किलोमीटर लांबीच्या मेट्रो रेल्वे प्रकल्पांचे नियोजन केले असून त्यापैकी १२ हजार कोटी एवढया अंदाजित खर्चाच्या, दहिसर ते दादाभाई नौरोजी नगर या १८.५ किलोमीटर आणि दहिसर (पूर्व) ते अंधेरी (पूर्व) या १६.५ किलोमीटर लांबीच्या मार्गिकांसाठी मान्यता मिळालेली आहे.

७१. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या सभोवताली ३० नगरांचा समावेश असणाऱ्या स्मार्ट सिटी **“ नयना ”** चा विकास करण्याची जबाबदारी शासनाने सिडकोवर सोपविलेली आहे. त्यात शैक्षणिक, वैद्यकीय, करमणूक, यंत्रणाव्यवस्थापन,वाणिज्यिक, वैज्ञानिक, उद्योगविषयक कार्यक्षेत्रे इत्यादींवर विशेष भर देण्यात येईल या प्रयोजनासाठी राज्य शासनाने ६०० चौरस किलोमीटर इतके क्षेत्र अधिसूचित केले आहे.

७२. सुमारे ७,७०० हेक्टर एवढे एकूण क्षेत्र असलेल्या ७ नगरांचा समावेश असलेल्या दक्षिण नवी मुंबईचा **ब्राऊनफिल्ड स्मार्ट सिटी** म्हणून विकास करण्यासाठी, सिडको सुमारे ३५ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करीत आहे. या प्रकल्पामध्ये परवडणारी घरे, मेट्रो कॉरिडॉर, बंदर-शहर विकासाबरोबरच आर्थिक व पायाभूत सुविधा प्रकल्प यांवर मुख्यतः भर देण्यात येईल व हा प्रकल्प पुढील ४ वर्षांमध्ये पूर्ण होईल.

७३. पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरांचा व सभोवतालच्या क्षेत्राच्या जलद व नियोजनबद्ध विकासाच्या सुनिश्चितीकरिता, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने, २०१५ मध्ये ६६१६ चौरस किलोमीटर इतके क्षेत्र अधिसूचित केले आहे.

७४. केंद्र सरकारने **स्मार्ट सिटी अभियानाच्या** पहिल्या टप्प्यात, पुणे व सोलापूर ही दोन शहरे निवडली असून त्याद्वारे राज्यामध्ये आणखी ८ स्मार्ट सिटी निर्माण करण्यात येतील.

७५. नागरी क्षेत्रांमध्ये पाणीपुरवठा, मलनिस्सारण व परिवहन यांसारख्या पायाभूत सेवा पुरवण्याच्या उद्देशाने भारत सरकारने " अटल पुनरुज्जीवन व नागरी रूपांतरण (अमृत) अभियान " पुरस्कृत केले असून राज्यातील ७६ टक्के शहरी लोकसंख्या असणाऱ्या ४३ शहरांमध्ये ते राबविण्यात येईल.

७६. माझ्या शासनाने, मुंबई महानगर प्रदेश, नाशिक, पुणे, पिंपरी-चिंचवड, सोलापूर, औरंगाबाद आणि नागपूर शहर येथे मुदतबाह्य ऑटो रिक्षा परवान्यांच्या जागी सोडत पध्दतीने नवीन परवाने देण्याचे ठरविले असून याचा अंदाजे ४२ हजारपेक्षा अधिक अर्जदारांना लाभ मिळेल.

७७. ३०,००० किलोमीटर इतक्या लांबीच्या ग्रामीण रस्त्यांची दर्जोन्नती करण्यासाठी व वाड्या व वस्त्या यांना जोडणाऱ्या ७३० किलोमीटर इतक्या लांबीच्या रस्ते जोडण्याची तरतूद करण्यासाठी, १३,००० कोटी रुपये इतक्या अपेक्षित खर्चाची " मुख्यमंत्री ग्रामसडक योजना " सुरू करण्यात आली आहे.

७८. १४व्या वित्त आयोगाअंतर्गत ग्रामपंचायतींना मिळणाऱ्या निधीचा विनियोग सुयोग्य पद्धतीने व्हावा याकरिता " आमचे गाव, आमचा विकास " ही संकल्पना सुरू करण्यात आली आहे.

७९. मला हे आपणास सांगताना आनंद होतो की, " स्वच्छ भारत अभियान " याच्या धर्तीवर, " स्वच्छ महाराष्ट्र अभियान " अंतर्गत कोल्हापूर महानगरपालिका व ५१ नगरपरिषदा या " हागणदारी मुक्त " म्हणून घोषित केल्या आहेत. आगामी काळात हे अभियान उर्वरित नगरपालिकांमध्ये अधिक गतिमान करण्यास शासन कटिबद्ध आहे.

८०. २०१५-१६ मध्ये, ४२१ कोटी रुपयांहून अधिक प्रोत्साहनपर रक्कम देऊन राज्यात ४,४०,००० पेक्षा जास्त स्वच्छतागृहे बांधण्यात आली आहेत. आतापर्यंत ५,२७६ पेक्षा जास्त गावांना " हागणदारी मुक्त " म्हणून घोषित करण्यात आले आहे.

८१. केंद्र सरकारने नुकत्याच जाहीर केलेल्या स्वच्छ शहरांच्या गुणवत्ता यादीमध्ये राज्यातील पिंपरी-चिंचवड व मुंबई या दोन शहरांचा पहिल्या दहामध्ये समावेश करण्यात आला आहे. ही अत्यंत समाधानाची बाब आहे.

८२. माझ्या शासनाच्या महत्त्वाकांक्षी अशा महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अन्वये नागरिकांसाठीच्या ३१५ लोकसेवा अधिसूचित करण्यात आल्या असून त्यापैकी १५६ सेवा नागरिकांना ऑनलाईन उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. उर्वरित अधिसूचित सेवा २ ऑक्टोबर, २०१६ पर्यंत ऑनलाईन उपलब्ध करून देण्यात येतील.

८३. शासन व नागरिक यामध्ये ऑनलाईन संवाद अधिक प्रभावी करण्यासाठी ई-माहिती, ई-तक्रार निवारण, ई-सेवा व ई-सहयोग यांचा वापर करून " आपले सरकार " हे ऑनलाईन पोर्टल सुरु केले आहे. या पोर्टलवर आतापर्यंत सुमारे ९ लाखांपेक्षा अधिक अर्ज, विहित वेळेत समाधानकारकरीत्या निकाली काढण्यात आले आहेत.

८४. सार्वजनिक वितरण व्यवस्था, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना आणि शिष्यवृत्ती व निवृत्तिवेतन योजना यांसह " जाम त्रिसुत्री " म्हणून लोकप्रिय असलेल्या " जन धन आधार मोबाईल योजना " यांच्या एकत्रीकरणातून सर्व व्यक्तिगत लाभार्थी योजनांमधील त्रुटी दूर करण्यावर शासनाने भर दिला आहे.

८५. सार्वजनिक वितरण व्यवस्थेमध्ये पारदर्शकता राखण्यासाठी संगणकीकरण करण्याचे काम सुरू असून, एकूण ७ कोटींपैकी ४ कोटींहून अधिक शिधा पत्रिकांची " आधार नोंदणी " पूर्ण करण्यात आली आहे आणि उर्वरित काम जलदगतीने पूर्ण करण्यात येत आहे.

८६. " २०२२ पर्यंत सर्वांना घरे " या अभियानांतर्गत, मोठ्याप्रमाणात आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील आणि अल्प उत्पन्न गटांतील लोकांच्या घरांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी माझे शासन केंद्रपुरस्कृत **" प्रधान मंत्री आवास योजना "** शीघ्रगतीने राबविण्यास कटिबद्ध आहे.

८७. धारावी पुनर्विकास प्रकल्पाच्या सेक्टर १ ते ४ साठीची जागतिक निविदा प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. सेक्टर- ५ चा विकास म्हाडाकडून करण्यात येत आहे.

८८. मुंबई विकास विभाग (बी.डी.डी.) चाळींचा पुनर्विकास करण्याचा शासनाचा मनोदय आहे.

८९. माझे शासन अनुसूचित जातींकरिता " रमाई योजना ", अनुसूचित जमातींकरिता " शबरी योजना " यांसारख्या अनेक ग्रामीण गृहनिर्माण योजना राबवित आहे. दारिद्रयरेषेखालील लाभार्थींना भूखंड खरेदी करण्यासाठी आर्थिक सहाय्य करण्याकरिता **" पंडित दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना "** सुरू करण्यात आली आहे.

९०. जून २०१५ मध्ये घोषित केलेल्या **" प्रगत शैक्षणिक कार्यक्रम "** या अंतर्गत आतापर्यंत सुमारे ५५० शाळा प्रगत करण्यात आल्या आहेत.

९१. बाह्य अभिकरणाने केलेल्या मूल्यमापनावरून, प्राथमिक स्तरावर भाषा व गणित या विषयांमध्ये १० टक्के सुधारणा झाल्याचे दिसून आले आहे.

९२. लोक सहभागामार्फत ९८२६ शाळा संगणकीकृत झाल्या असून ७७८ शाळांना " आयएसओ ९००० " मानांकन मिळाले आहे.

९३. शासनाने विकसित केलेल्या " सरल " संगणक प्रणालीद्वारे १५० प्रकारची माहिती मागवण्याची अट काढण्यात आली असून, या प्रणालीमुळे विद्यार्थ्यांची संख्या व त्यांची शैक्षणिक प्रगती याची वस्तुनिष्ठ परिगणना करणे शक्य झाले आहे.

९४. पुणे व नागपूर येथे " भारतीय माहिती तंत्रज्ञान संस्था " (आयआयआयटी) स्थापन करण्याकरिता भारत सरकार, महाराष्ट्र शासन व खाजगी भागीदार यांच्यामध्ये डिसेंबर, २०१५ मध्ये सामंजस्य करार करण्यात आला असून २०१६-१७ पासून या संस्थेचे पहिले विद्यावर्ष सुरू होणे अपेक्षित आहे.

९५. नागपूर येथील भारतीय व्यवस्थापन संस्थेचे (आयआयएम) पहिले विद्यावर्ष यापूर्वीच २०१५-२०१६ पासून सुरू झाले आहे.

९६. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ विधेयक, २०१५ हे अगोदरच आपल्या समोर मांडलेले आहे. त्यावर विचारविमर्श करण्याची आपणास विनंती आहे.

९७. मुंबई येथील महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठाने २०१५-२०१६ पासून आपले पहिले विद्यावर्ष सुरू केले आहे. तसेच, नागपूर व औरंगाबाद येथील महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठेही यापूर्वीच अधिसूचित करण्यात आली आहेत.

९८. शासनाने अखिल भारतीय वैद्यकीय शास्त्र संस्थेच्या (एम्सच्या) स्थापनेकरिता नागपूर येथील मिहानमध्ये १५० एकर जमीन वितरित केली आहे.

९९. चंद्रपूरमध्ये एमबीबीएसच्या १०० जागा असलेले एक नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आता पूर्णपणे कार्यरत झाले असून गोंदियामध्ये एमबीबीएसच्या १०० जागा असलेले आणखी एक वैद्यकीय महाविद्यालय आणि वाशिम येथे दंतवैद्यक महाविद्यालय सुरू करण्याचे देखील प्रस्तावित केले आहे.

१००. प्राचीन शास्त्रांच्या अध्यापनास व उपयोजनास चालना मिळण्यास आणि त्यांचे विनियमन करण्यास मदत होणारे **" महाराष्ट्र योग व निसर्गोपचार विधेयक, २०१६ "** मांडण्याचा शासनाचा विचार आहे.

१०१. शासकीय रुग्णालयातील पहिली मुत्रपिंड प्रतिरोपण शस्त्रक्रिया ही फेब्रुवारी, २०१६ मध्ये नागपूर येथील अतिविशेषता रुग्णालयामध्ये यशस्वीपणे पार पाडण्यात आली, हे सांगण्यास मला आनंद होतो.

१०२. औषधनिर्माण व्यवसायामध्ये सुलभता आणण्याच्या दृष्टीने, औषधांची विक्री करण्याकरिता लागणारे आधारसंलग्न अधिप्रमाणित परवाने आता संपूर्णतः ऑनलाईन करणारे महाराष्ट्र हे भारतातील एकमेव राज्य आहे.

१०३. सर्वसामान्य जनतेस खाजगी रुग्णालयांमध्ये वाजवी दरात चांगल्या आरोग्य सेवा मिळणे शक्य व्हावे यासाठी, " सार्वजनिक आरोग्य विधेयक " आणि " महाराष्ट्र दवाखाने आस्थापना विधेयक " मांडण्याचे प्रस्तावित आहे.

१०४. माझ्या शासनाने, जनजाति उप-योजना क्षेत्रांतील अंगणवाड्यांमधील मुलांसाठी उच्च पोषणमूल्य असणारी अंडी व केळी देण्यास सुरुवात केली आहे.

१०५. मेळघाट, धडगांव, सुरगणा आणि मोखाडा सारख्या दुर्गम क्षेत्रांतील दीर्घकालीन आजार असलेल्या रुग्णांसाठी अग्रगण्य कंपन्यांची सामाजिक जबाबदारी

कार्यक्रमाअंतर्गत टेलि-मेडिसिन द्वारे **" शिव आरोग्य योजना "** लवकरच सुरू करण्यात येईल. शासकीय रुग्णालयांतील तज्ज्ञ वैद्यकीय अधिका-यांची कमतरता दूर करण्यासाठी, नवीन पदव्युत्तर पदविका पाठयक्रम सुरू करण्यात येईल.

१०६. सार्वजनिक-खाजगी भागीदारीमार्फत जिल्हा रुग्णालयांत हृदयोपचार केंद्रे सुरू करण्याचा शासनाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे.

१०७. लिंगाधारित स्त्री-पुरुष निश्चितीस आळा घालण्याच्या दृष्टीने आणि मुलगी वाचविण्याची तसेच तिच्या संरक्षणाची सुनिश्चिती करण्यासाठी **" माझी कन्या भाग्यश्री "** योजना १ एप्रिल, २०१६ पासून राबविण्यात येईल.

१०८. महिलांना वाहन चालवण्याचे प्रशिक्षण देण्यात येत असून, त्यामुळे त्यांना अधिक चांगल्या अर्थार्जनाच्या संधी मिळणे शक्य होईल.

१०९. सरोगसी पध्दतीद्वारे अपत्य झालेल्या महिला शासकीय कर्मचाऱ्यांना, शासनाने १८० दिवसांपर्यंत विशेष रजा मंजूर करण्याचा निर्णय घेतला आहे.

११०. एअर इंडिया मध्ये केबिन क्रूच्या नियुक्तीसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचेकडून अनुसूचित जातीच्या उमेदवारांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

१११. संघ लोकसेवा आयोगाकडून घेतल्या जाणाऱ्या नागरी सेवा परीक्षेसाठी महाराष्ट्रातील अनुसूचित जातींच्या पात्र उमेदवारांकरिता दिल्ली येथील नामवंत प्रशिक्षण संस्थेमध्ये खास शिक्षण घेण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

११२. आदिवासी क्षेत्रांमध्ये कमी वजनाची मुले जन्मास येणे, रक्तक्षय व कुपोषण कमी करणे यांसाठी १५ डिसेंबर, २०१५ पासून **" डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना "** राबविण्यात येत असून या योजनेचे उद्दिष्ट, गरोदर व स्तनदा मातांना सकस आहार पुरवून त्यांच्या पोषण आहारविषयक गरजा पूर्ण करणे, असे आहे.

११३. शासकीय आश्रमशाळेतील अनुसूचित जमातींच्या विद्यार्थ्यांसाठी सकस, संतुलित, ताजी न्याहारी आणि भोजन पुरविण्याकरिता मुंढेगाव, जि. नाशिक आणि

कांबळगाव, जिल्हा पालघर येथील दोन्ही आश्रमशाळांमध्ये टाटा ट्रस्ट व अक्षयपात्र प्रतिष्ठान यांच्या सहयोगाने शासनाने " अन्नपूर्णा मध्यवर्ती स्वयंपाकगृह योजना " सुरू केली आहे.

११४. नामांकित इंग्रजी माध्यमांच्या निवासी शाळांमध्ये शिक्षण घेण्यासाठी अनुसूचित जमातींच्या विद्यार्थ्यांच्या संख्येत २५०० वरुन २५००० अशी भरीव वाढ केली आहे.

११५. राज्याच्या अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतींना यापुढे जनजाति उप योजनेमधील ५ टक्के निधी थेट देण्याचा निर्णय घेण्यात आला असून २०१५-१६ साठी २५८ कोटी रुपये इतका निधी सुमारे २९०० ग्रामपंचायतींना स्थानिक गरजेनुसार विकासाची कामे हाती घेण्यासाठी दिला जात आहे.

११६. पंचायतीसंबंधीचे उपबंध (अनुसूचित क्षेत्रांवर विस्तारित करणे) अधिनियम, १९९६ च्या तरतुदीअंतर्गत समाविष्ट केलेल्या अनुसूचित क्षेत्रांत, तेंदू आणि बांबू यासारख्या नैसर्गिक साधनसंपत्तीची व्यवस्था व विक्री करण्याचा अधिकार मिळाल्याने आता ग्रामस्थांना चांगले उत्पन्न मिळू लागले आहे, याचा मला आनंद होतो.

११७. ऊस कामगारांच्या कामाच्या स्थितीत सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९ अन्वये **" लोकनेते गोपीनाथ मुंडे महाराष्ट्र ऊस-तोड व वाहतूक आणि इतर असंरक्षित श्रमजीवी कामगार महामंडळ "** घटित करण्यात आले आहे.

११८. अल्पसंख्याकांच्या सर्वांगीण विकासासाठी शासन कटिबद्ध असून त्या अनुषंगाने विविध योजनांची अंमलबजावणी करीत आहे. २०१५-१६ मध्ये अल्पसंख्याक मुलींसाठी ९ वसतिगृहे सुरू करण्यात आली असून जून, २०१६ पासून सेलू, पाथरी, जिंतूर, भंडारा, अमरावती व नांदेड येथे अल्पसंख्याक मुलींची वसतिगृहे सुरू करण्यात येतील.

**पर्यटन**

११९. २०१० या वर्षी वाघांची संख्या १६९ इतकी होती त्यामध्ये वाढ होऊन आता वाघांची संख्या १९० इतकी झाली आहे. पेंच व ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या धर्तीवर

मेळघाट व नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्पासाठी विशेष व्याघ्र संरक्षण बल निर्माण करण्यात आले आहे. वन्य पशुंमुळे होणाऱ्या पिकांच्या हानीसाठी दिले जाणारे आर्थिक सहाय्य दुप्पट करण्यात आले आहे. संत्रा आणि मोसंबीच्या फळबागांच्या नुकसानीसाठी विशेष तरतूद केली आहे. ताडोबा, गोरेवाडा व संजय गांधी राष्ट्रीय उद्यान यांना जागतिक पर्यटन क्षेत्राचा दर्जा देण्यात येणार आहे.व्याघ्र प्रकल्पांच्या संरक्षित (बफर) क्षेत्रात वसलेल्या गावांचा एकात्मीकृत विकास करण्यासाठी **“ डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी जन वन विकास योजना ”** सुरू करण्यात आली आहे. त्यामुळे त्या क्षेत्रांतील गावकऱ्यांचा सामाजिक, आर्थिक दर्जा उंचावेल.

१२०. जेष्ठ नागरिक, माजी सैनिक, अपंग व्यक्ती आणि शालेय विद्यार्थी गटांना महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या विश्रामगृहांमध्ये २० टक्के इतकी सवलत देण्यात येत आहे.

१२१. जानेवारी २०१६ पासून महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ आणि पवनहंस हवाई सेवा यांच्या संयुक्त विद्यमाने मुंबई येथे “ हेली जॉय राईड सेवा ” सुरू केली आहे.

१२२. मराठी भाषेचे जतन, संवर्धन, विकास व प्रचार करण्यास शासन कटिबद्ध आहे. त्यासाठी माझे शासन दर वर्षी “ मराठी भाषा संवर्धन पंधरवडा ” साजरा करीत असून त्याला जनतेचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. सर्वसाधारण नागरिकांना त्यांच्या भाषेतून कायद्याचे ज्ञान मिळावे व त्यांना मराठी भाषेतील कायदे विनामूल्य उपलब्ध व्हावेत याकरिता मराठी भाषेत अनुवाद केलेले ५८६ राज्य अधिनियम तसेच “ भारताचे संविधान ” ही द्विभाषी आवृत्ती आणि १६६ केंद्रीय अधिनियमांचे मराठी प्राधिकृत पाठदेखील भाषा संचालनालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून दिले आहेत.

१२३. इचलकरंजी येथील दत्ताजीराव कदम तंत्रशिक्षण संस्थेच्या सहाय्याने, राज्य मराठी विकास संस्था, **“ वस्त्रनिर्मिती माहिती कोश ”** तयार करीत आहे. त्यात भारतातील वस्त्रोद्योग, वस्त्रनिर्मिती कलेच्या विकासातील विविध टप्प्यांचा अंतर्भाव आहे.

१२४. देशातील आणि विदेशातील पर्यटकांना, आपली संस्कृती, पारंपरिक कला आणि हस्तकला, खाद्यपदार्थ, इतिहास आणि पर्यटन ठिकाणांची माहिती करून देण्यासाठी आणि आपल्या कारागीरांसाठी नवीन बाजारपेठ निर्माण करण्यासाठी, " महा-जत्रा " हा महाराष्ट्र उत्सव आयोजित केला होता. नवी दिल्लीतील प्रतिष्ठित अशा " दिल्ली हाट " येथे आयोजित करण्यात आलेल्या या उत्सवाला भरघोस प्रतिसाद मिळाला असून सुमारे दीड लाख पर्यटकांनी या उत्सवास भेट दिली.

१२५. सन्माननीय सदस्यहो, या अधिवेशनाच्या कालावधीत पूरक मागण्या, २०१६-१७ या वर्षाचा अर्थसंकल्प, लेखानुदान, विविध विधेयके आणि इतर शासकीय आणि अशासकीय कामकाज आपल्यापुढे विचारार्थ मांडण्यात येईल.

या अधिवेशनातील आपल्या सर्व विचारविमर्शास मी सुयश इच्छितो.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !!**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई